संदर्भ सेवा रूग्णालय, सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः स्थापना-२०१८/ प्र.क्र.९९/ आरोग्य-४.
मंत्रालय, १० वा मजला, संकुल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई,
तारीखः ६ मार्च, २०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.स्थापना-२०१८/प्र.क्र.९९/आरोग्य-४, दि.१७.१०.२०१८.
२) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/कक्ष-३/टे-६/संसेरूसिंधुदूर्गबांध/३०२८-२९/१८,दि.०५.११.२०१८.

प्रस्तावना :-

सन २०१८ च्या महाराष्ट्र विधीमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये मा. मंत्री (वित्त) यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात संदर्भ सेवा रूग्णालय सुरू करण्यासाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात रू.२० कोटी निधी मंजूर करण्याची घोषणा केली आहे. त्या अनुषंगाने कुडाळ येथील महिला व बाल रूग्णालयाच्या जागेत संदर्भ सेवा रूग्णालय सुरू करण्याचा निर्णय दि.१७.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. तथापि, जागेची उपलब्धता विचारात घेऊन कुडाळ ऐवजी अन्य ठिकाणी संदर्भ सेवा रूग्णालय सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथील महिला व बाल रूग्णालयाच्या जागेत सुरू करण्यास मान्यता देण्यात आलेले संदर्भ सेवा रुग्णालय जागेच्या उपलब्धतेनुसार सावंतवाडी येथील उपजिल्हा रूग्णालयाच्या जागेत सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर रूग्णालयासाठी उपलब्ध असलेल्या जागेत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पदनिर्मितीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेताक २०१९०३०६१८२२१०४३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2019.03.06 18:54:06 +05'30'

(प्र. मो. बलकवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
२. आयुक्त तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य भवन, मुंबई,
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई,
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई,
५. सहसंचालक, रूग्णालये (राज्यस्तर), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई,
६. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे,
७. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर,
८. सहाय्यक संचालक (लेखा व प्रशासन), आरोग्य सेवा, मुंबई,
९. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय, सिंधुदूर्ग,
१०. महिला व बाल रूग्णालय, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग,
११. जिल्हा आरोग्य अधिकारी, सिंधुदुर्ग,
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदूर्ग,
१३. वित्त विभाग (विनियम कार्यासन), मंत्रालय, मुंबई,
१४. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (आरोग्य-४).